माहितीचा अधिकार

# राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

## क्र.मुमाआ/नों.क्र.३१३६/२२/अ.क्र.२६४९/२६

श्री.रत्नाकर पाटील.
मु.पो.घाटीम, नवघर व्हाया उंबरपाडा,
ता.जि.पालघर ४०११०२.

विरुद्ध

जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी (माध्यमिक विभाग)
बृहन्मुंबई महानगरपालिका- शिक्षण विभाग, उपशिक्षणधिकारी
(खाप्राशा) कार्यालय, त्रिवेणी संगम म.न.पा.शालेय इमारत,
४ था मजला, महादेव पालव मार्ग, करिरोड(पू.) मुंबई – ४०००१२.

प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक)
शिक्षण विभाग बृहन्मुंबई महानगरपालिका शिक्षण विभाग,
उपशिक्षणधिकारी (खाप्राशा) कार्यालय, त्रिवेणी संगम म.न.पा.शालेय
इमारत, ४ था मजला, महादेव पालव मार्ग, करिरोड(पू.) मुंबई – ४०००१२.

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : ०१.०४.२०२६**

अपीलकर्ता : उपस्थित
विद्यमान जन माहिती अधिकारी : अनुपस्थित
प्रथम अपीलीय अधिकारी : अनुपस्थित

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| १२.०४.२०२२ | २९.०३.२०२२ | २६.०५.२०२२ | ३०.०६.२०२२ |

प्रस्तुत प्रकरणी अपिलार्थी यांनी दाखल केलेल्या दि.१२/०४/२०२२ रोजीच्या **जोडपत्र अ** नुसार तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी तत्कालीन मा.राज्य मुख्य आयुक्त यांच्या दिनांक २८/०२/२०२२ रोजीच्या आदेशानुसार ग्रंथपाल पदोन्नती बाबत गहाळ झालेल्या कागदपत्रांचे स्पष्टीकरण व दिनांक १४/०३/२०२२ रोजीचा अहवाल दिनांक २९/०३/२०२२ रोजी मा.मुख्य माहिती आयुक्त यांना पाठविण्यात आला त्याची प्रत अपिलार्थींना देण्यात आली असल्याचे नमूद केले आहे. तथापि, त्यातील अहवाला सोबत पाठविलेल्या कव्हरिंग पत्राची प्रत, जावक रजिस्टरच्या पानाची प्रत मात्र अप्राप्त असून तत्कालीन अपिलीय अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी यांनी पुढील पंधरा दिवसात मागितलेली माहिती विनामूल्य देण्याचे निर्देश दिलेले असून अपिलार्थी यांनी त्यांना त्यानंतर अपिलीय अधिकाऱ्यांनी दिलेल्या आदेशानुसार मागणी केलेल्या कागदपत्रांच्या

Jyotsna

छायांकित प्रती पाठविण्यात आल्या असल्याचे दि.३०/०६/२०२२ रोजीचे पत्र देखील आढळून येते. तथापि, दिलेली माहिती ही असमाधानकारक असून त्यात त्यांना अपेक्षित असणारी कागदपत्रे ही तत्कालीन माननीय मुख्य आयुक्त यांच्या आदेशानंतर जाणून बुजून गहाळ करण्यात आली असल्याचा गंभीर आरोप केलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणी प्राधिकरणाने कुठलाही खुलासा सादर केलेला नसून अपिलार्थी यांनी त्यांच्या **जोडपत्र अ** मध्ये तसेच या आधीच्या झालेल्या सुनावणीमध्ये माननीय मुख्य आयुक्त यांच्या आदेशानंतरही कागदपत्रे गहाळ केली असल्याचे व उपरोक्त कागदपत्रे गहाळ केलेल्या कर्मचाऱ्याच्या सेवानिवृत्तीमुळे त्यांच्या विरुद्ध कुठलीही कार्यवाही करणे शक्य नसल्याच्या प्रतिसादाकडे लक्ष वेधले असून झालेली बाब अतिशय गंभीर असल्याचे नमूद केलेले आहे. ही बाब लक्षात घेता विद्यमान उपशिक्षणाधिकारी माध्यमिक व विद्यमान शिक्षणाधिकारी माध्यमिक, बृहन्मुंबई महानगरपालिका शिक्षण विभाग यांनी या **संपूर्ण प्रकरणात स्वतः लेखी खुलासा सादर करावा व त्यानंतर उपरोक्त प्रकरणी पुढील आदेश पारित करण्यात येतील.**

**आदेश**

**१. वरील विवेचनानुसार जन माहिती अधिकारी यांनी कार्यवाही करावी.**

**२. लेखी खुलासा सादर झाल्यानंतर या प्रकरणी आदेश पारित करण्यात येतील.**

State Information Commission ★ Maharashtra ★

**मुंबई**
**दिनांक : ०१-०४-२०२६**

**( राहुल भा. पांडे )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

Jyotsna